# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २३.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २२/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६२,४००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २२/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ३.९६ लिटर दारू असा एकुण १,७६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २२/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य एक मोबाईल व नगदी असा एकुण १,२३०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक २२/१०/२०२२ रोजी फिर्यादी नितेश शेषराव चव्हाण वय ४१ वर्ष व्य.वकील रा.जिजामाता नगर हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम २७९,३०४अ,३३७,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२१.१०.२२ रोजी चे २१:४५ वा चे सुमारास हिंगोली येथे बस स्थानकाच्या समोरील रोडच्या बाजुला हिंगोली येथे फिर्यादीचे काका राजाभाउ बाबाराव चव्हाण वय ६५ वर्ष रा. जिजामाता नगर हिंगोली हे हिंगोली येथील बस स्थानका समोरील रोडच्या बाजुला उभे असतांना बोलेरो पिकअप क्र एम.एच.३८ एक्स २८२३ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहण भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालवुन जोराची धडक दिली व बाजुस मो.सा.वर बसुन जाणारे ईसम नामे यासीनखॉ आलमखान पठाण यांना सुध्दा जोराची धडक दिली त्यामुळे तो सुध्दा गंभीर जख्मी झाला व दोघावर उपचार चालु असतांना फिर्यादीचे काका हे मरण पावले त्याचे मरणास बोलेरो पिकअप क्र एम.एच.३८ एक्स २८२३ चा चालक कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.